# नियमित दिवाणी दावा क्रमांक १६९/२०२१ मधील आदेश नि.क्र.९

(CNR No. MHSO130002182021)

१. वादीने प्रस्तुत अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दाव्यात दुरुस्ती करणेकरिता दाखल केला आहे.

२. वादीचे अर्जातील कथन असे आहे की, वादीने प्रतिवादी क्र.१ ते ४ विरुध्द दावा मिळकतीचे वाटप व निरंतर मनाईसाठी दाखल केला आहे. दाव्याचे कामकाज चालू असताना यातील प्रतिवादी क्र.१, ३ यांनी आपसात संगनमत करुन वादीस दावा मिळकतीतील हिस्सा मिळू नये या दृष्ट भावनेने दि.१५/३/२०२१ रोजी रजि. दस्त नं.१६१०/२०२१ व १६११/२०२१ ने दाव्यातील काही मिळकती बक्षीसपत्राने हस्तांतरण केल्या आहेत. त्यामुळे दाव्यात खालीलप्रमाणे दुरुस्ती करणे गरजेचे आहे.

दाव्यात प्रतिवादी नं.४ नंतर नवीन आकडा ''५ टाकून त्यापुढे कु. शिवराज दिपक पवार, वय – २ वर्षे, धंदा – नाही, रा. गोडसेवाडी, ता. बार्शी ची अ.पा.क. जनक आई सौ. प्रतिक्षा दिपक पवार, वय – २१ वर्षे, धंदा – घरकाम, रा. गोडसेवाडी, ता. बार्शी'' असा मजकूर लिहून त्यानंतर दावा कलम ३ नंतर ''३अ'' हे नवीन कलम टाकून त्यामध्ये, ''दाव्याचे कामकाज चालू असताना प्रतिवादी १ व ३ यांनी संगनमत करुन दावा जमिनीत वादीस हक्क हिस्सा मिळू नये म्हणून दि.१५/३/२०२१ रोजी प्रतिवादी १ ने प्रतिवादी नं.३ चे मुलाचे नांव म्हणजेच प्रतिवादी ५ चे नांवे रजि. बक्षीसपत्र दस्त नं.१६१०/२०२१ व १६११/२०२१ अन्वये बेकायदेशीररित्या खांडवी येथील गट नं.५१८ पैकी पूर्व बाजूची ०–५१ आर व ग.नं.३२५ पैकी पूर्व बाजूची ०१ हे. २० आर जमीन चे नांवे केलेली आहे. सदर दोन्ही दस्तास प्रतिवादी नं.३ हा साक्षीदार आहे. सदरचे दोन्ही दस्तास वादी पक्षकार नाही वा वादीची सदर दोन्ही दस्तास संमती नाही त्यामुळे प्रतिवादी १ ने प्रतिवादी नं.५ चे नांवे रजि. बक्षिसपत्र दस्त नं.१६१०/२०२१ व १६११/२०२१ चे केलेले दस्त हे बेकायदेशीर असुन ते वादीचे हक्क हिस्सावर बंधनकारक नाहीत यासाठीही वादीचा दावा प्रतिवादी विरुध्द आहे'' तसेच दावा कलम १०अ मध्ये ''तसेच प्रतिवादी १ ने प्रतिवादी नं.५ चे हक्कात ता.१५/३/२०२१ रोजी करुन दिलेले बक्षिसपत्र दस्त नं.१६१०/२०२१ व १६११/२०२१ हे बेकायदेशीर असून ते वादीचे हक्क हिस्स्यावर बंधनकारक नाहीत असे जाहीर होवून मिळावे''

३. सदर अर्जावर प्रतिवादीचे म्हणणे मागविण्यात आले. प्रतिवादीने त्यांचे म्हणणे देऊन असे कथन केले आहे की, अर्जास हरकत आहे. वादीने अर्जमध्ये मागणी केलेली दुरुस्ती ही कायदेशीर

नाही. वादीचे दाव्याच्या स्वरुपामध्ये बदल होणार आहे. प्रतिवादीविरुध्द अन्याय होणार आहे. वादीचे दाव्यामध्ये बदल होणार आहे. वादीचा  अर्ज नामंजूर करण्यात यावा. यदाकदाचित अर्ज मंजूर करणेचे मतापर्यंत मे. कोर्ट आले तर रुपये १०००/– कॉस्ट देवविण्यात यावी.

४.	अर्ज व म्हणण्याचे अवलोकन केले. सदर दुरुस्ती ही दावा दाखल केल्यानंतरची कथित घटना घडल्यामुळे मागितलेली असल्याचे दिसते. वादीने मागितलेली दुरुस्ती ही प्रतिवादी नं.१ व ३ यांनी दावा चालू असताना दाव्यातील काही मिळकती बक्षीसपत्राने हस्तांतरण केल्याचे नमूद आहे. सदर प्रकरणातील अभिलेखावरील कागदपत्रे व वादीचे अर्जातील कथने पाहता आणि रजिस्टर दस्त नं.१६१०/२०२१ व १६११/२०२१ यांची प्रथमदर्शनी प्रत पाहता सदर दाव्यात दुरुस्ती करणे न्यायोचित वाटते कारण कथित घटना ही दावा दाखल केल्यानंतर घडलेली आहे आणि दाव्याचे अनेकीकरण टाळणे हे दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ चा उद्देश आहे. त्यामुळे सदर दुरुस्ती ही न्यायाच्या दृष्टीने मंजूर करणे आवश्यक वाटते. सदर दुरुस्तीमुळे प्रतिवादीचे काहीही नुकसान होणार नाही. सदर अर्ज मंजूर केल्यास दाव्याचे कामकाज गुणावगुणावर चालून निकाल देण्यास मदत होणार आहे व प्रतिवादीलाही सदर दुरुस्तीनंतर जादा कैफियत देण्याचे स्वातंत्र्य आहे. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येते.

## <u>आदेश</u>

१.	वादीचा अर्ज रक्कम रुपये २००/– खर्च बसवून मंजूर करण्यात येतो.

२.	वादीने विहित मुदतीत दाव्यात दुरुस्ती करावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by NILESH SHRIPAL SABNIS
Date: 2021.12.18 16:56:49 +0530

दि.१८/१२/२०२१.

(एन.एस.सबनीस)
४थे सह दि.न्या.क.स्तर, बार्शी

# C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | Y.V.Sital |
| (b) | Court | : | Shri. N.S.Sabnis<br>4th Jt. Civil Judge, J.D.&<br>J.M.F.C.Barshi |
| (c) | Judgment /Order signed by P.O. on | : | 18/12/2021 |
| (d) | Judgment /Order uploaded on | : | 20/12/2021 |